वाचा : १— मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनीय पत्र क्र. बी(जन)५६०१/५७/२०१८ /१२४७. दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१८ व त्यानुसार लघुलेखक (निम्नश्रेणी) निवड/प्रतिक्षा यादी.

२— दिनांक ११—१०—२०१८ रोजी लघुलेखक (निम्नश्रेणी) पदाची निवड/प्रतिक्षा यादी.

---

## कार्यालयीन आदेश क्र. ( 1091 )

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भीय पत्र क्र. १ मध्ये निर्देशित करण्यांत आलेल्या अटी व शर्ती नमुद करुन जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी मार्फत दिनांक ११—१०—२०१८ रोजी लघुलेखक निम्नश्रेणी पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. लघुलेखक निम्नश्रेणी पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नेमणुक देणे बाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी हे खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत. सदर आदेश तात्काळ प्रभावाने अंमलात येतील.

| अ.क्र. | निवड/प्रतिक्षा यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराचे नांव | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १* | श्री. तुळशीराम प्रल्हादराव नरवाडे, लघुलेखक (निम्नश्रेणी) पदाची प्रतिक्षा/निवड यादी सन—२०१८ मधील अ.क्र. (४) वरील उमेदवार | यांना लघुलेखक (निम्नश्रेणी) (ग्रेड—३) या पदावर तदर्थ स्वरुपात नियुक्ती देण्यांत येत असुन त्यांची नेमणुक दिवाणी न्यायाधीश व. स्तर, परभणी यांचे आस्थापनेवर चौथे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, परभणी यांचे न्यायालयात रिक्त असलेल्या पदावर करण्यांत येत आहे. |

### नेमणुकीच्या अटी व शर्ती

०१) उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदासाठी निवड प्रक्रियेच्या वेळी घेण्यात आलेल्या इंग्रजी व मराठी श्रुतलेखन (Dictation) या चाचणी परीक्षेपैकी राखीव गटातील उमेदवारांना ज्या परीक्षेत ३० टक्के पेक्षा कमी गुण आणि खुल्या गटातील उमेदवारांना ज्या परीक्षेत ३५ टक्के पेक्षा कमी गुण मिळालेले आहेत, ती प्रत्येक चाचणी परीक्षा उमेदवारांनी त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

०२) त्या अनुषंगाने संदर्भ क्र. ०१ अन्वये उपरोक्त अ.क्र. ०४* वरील निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची लघुलेखक (निम्नश्रेणी) पदावरील निवड वर नमूद करण्यात आलेल्या अटीस अधीन राहून तदर्थ स्वरूपात (Ad-hoc basis) करण्यात आलेली आहे. म्हणून त्यांनी त्यांचे नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांना लागू असलेले बंधपत्र जिल्हा न्यायालय, परभणी येथे सादर करावे व त्यानंतरच त्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी कर्तव्यार्थ रुजु व्हावे.

## बंधपत्र

मी --------------- बंधपत्र लिहून देतो/देते की, माझी लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदावर निवड/प्रतिक्षा यादीमध्ये अ.क. ---- वर खालील अटीच्या अधिन राहुन निवड झालेली आहे.

१- माझी लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदावरील नेमणूक ही तदर्थ [Adhoc Basis] स्वरुपाची राहील.

२- लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदासाठी निवड प्रकियेच्या वेळी घेण्यांत आलेल्या इंग्रजी व मराठी श्रुतलेखन [Dictation] परीक्षेमध्ये ३५ टक्के (खुल्या प्रवर्गासाठी)/३० टक्के (राखीव प्रवर्गासाठी) पेक्षा कमी गुण प्राप्त झाले असल्यामुळे सदरची परीक्षा ही माझी उपरोक्त पदावर नियुक्ती झाल्यानंतर ०१ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे माझेवर बंधनकारक राहील.

३- माझी लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदावर नियुक्ती ही खुल्या/राखीव प्रवर्गातुन झाली असल्यामुळे मला इंग्रजी व मराठी श्रुतलेखन परीक्षेत खुल्या प्रवर्गाठी ३५ टक्के गुण/राखीव प्रवर्गासाठी ३० टक्के गुण मिळवणे माझेवर बंधनकारक राहील, सदर परीक्षेमध्ये मला ३५/३० टक्केपेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास माझी शासकीय सेवा तात्काळ संपुष्टात येईल याची मला कल्पना आहे.

करिता हे बंधपत्र लिहुन देतो/देते.

दिनांक : / /२०१८. स्वाक्षरी/-

ठिकाण : उमेदवाराचे नाव

प्रतिक्षा यादीतील अ.क. व संपूर्ण पत्ता :

०३) वरील उमेदवारास शासन निर्णय वित्त विभाग क. अंनियो-१००५/१२६/ सेवा-४, दिनांक ३१-१०-२००५ आणि शासन निर्णय क. अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७-०७-२००७ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील.

०४) वरील उमेदवारास सूचित करण्यात येते की, त्यांनी एक महिन्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

०५) नवनियुक्त उमेदवारास प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु व्हावेत. जर आपण विहीत मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रूजु झाले नाहीत तर तुमचे नाव प्रतिक्षा/निवड यादीतून कमी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

०६) वरील उमेदवारास प्रवास भत्ता आणि पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही.

जा.क.आस्था/ब-४/१४८८५/२०१८.
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी.
दिनांक : २६ / ११ / २०१८.

( उर्मिला एस. जोशी-फलके )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.

याची एक प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत :

०१- दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परभणी यांना देवुन निर्देशित करण्यांत येते की, संबंधीत उमेदवारास एकनिष्ठतेची शपथ देण्यांत यावी तसेच ते वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे घ्यावीत.
०२- चौथे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, परभणी.
०३- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०४- स्वीय सहायक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०५- अधिक्षक ( आस्थापना / न्यायदान शाखा ) जिल्हा न्यायालय, परभणी.
०६- सहायक अधिक्षक ( रोखा व वित्त / रा. शि. ) जिल्हा न्यायालय, परभणी.

०७- श्री. तुळशीराम प्रल्हादराव नरवाडे, रा. घर कं. ४७, सम्राट अशोक नगर, फुले कॉलनी जवळ, कारेगांव रोड, परभणी. - ४३१४०१.
मार्फत : दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, परभणी.

०८- संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देवुन निर्देशीत करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालय, परभणीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी.